# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

E-mail - smcgados2@gmail.com


जा.क्र/सआस/कक्ष-१/आस्था-१/ 209 दि. १६/०६/२०२५

संदर्भ :-1) शासन निर्णय क्र.अकंपा-1217/प्र.क्र.102/आठ, दि. 21 सप्टेंबर, 2017.

2) शासन निर्णय क्र.अकंपा-1220/प्र.क्र.167/का-8, दि. 06 जानेवारी, 2021.

3) मा. आयुक्त यांची दि. 16/06/2025 रोजीची मान्यता.

## -:नियुक्ती आदेश:-

मा. महानगरपालिका ठराव क्र.104, दिनांक. 30/06/1983 तसेच मा.म.न.पा.ठराव क्र.139 दिनांक 23/09/1985 अन्वये विहित केलेल्या धोरणानुसार सोलापूर महानगरपालिका सेवेत असतांना, सेवक दिवंगत झाल्यास त्याचे पात्र वारसास शैक्षणिक पात्रतेस अनुसरुन अनुकंपा तत्त्वाखाली सेवेत सामावून घेणेबाबतचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. सदर धोरणाचे अनुषंगाने वरील संदर्भ क्र.1 व 2 चे शासन निर्णयास अनुसरुन, मा.म.न.पा.ठराव क्र.212, दि. 10/12/2004 अन्वये ठरविणेत आलेले धोरणानुसार व मा.न.पा. ठराव क्र.1790 दि. 20/02/2021 नुसार खालील तक्त्यामध्ये नमूद उमेदवारांची दिनांक 16/06/2025 पासून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरीता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयाकडील रिक्त पदी प्रथमतः मूळ पगार हेच एकवट वेतन दोन वर्षाकरिता देय राहील. दोन वर्षानंतर नियुक्ती करण्यात आलेल्या पदाचे सातवे वेतन आयोगामधील वेतनस्तरानुसार+ महागाई भत्ता व इतर मान्य भत्तेयावर खालील शर्ती व अटीवर नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | पदनाम | कार्यालय | वेतनश्रेणी | एकवट वेतन रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 8 | श्रीमती नम्रता अभिजीत शिंदे | खुला | एस.ई.बी.सी. | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | S-1-15000-47600 | 15000 |

**शर्ती व अटी**

1. उपरोक्त तक्त्यात नमूद उमेदवारांची नियुक्ती ही प्रथमतः दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी राहील. सदर कालावधीमध्ये त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास त्यांना कोणतीही नोटीस न देता कमी करणेत येईल.
2. नियुक्त उमेदवारांना दोन वर्षानंतर नियुक्ती करण्यात आलेल्या पदाचे सातवे वेतन आयोगामधील वेतनस्तरानुसार+ महागाई भत्ता व इतर व मान्य भत्ते लागू राहील.
3. त्यांनी नोकरीत रुजू झालेपासुन एक महिन्याच्या कालावधीत मा. मेडिकल बोर्ड, सोलापूर महानगरपालिका, यांचे शारीरिक स्वास्थ प्रमाणपत्र (फिजीकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे आवश्यक राहील.
4. त्यांना महानगरपालिकेचे सध्या अस्तित्वात असलेले नोकरी विषयक अथवा त्यानंतर वेळोवेळी अमलात येणारे नियम, पोटकानून, विनियम, स्थायी आदेश इत्यादी लागू राहतील.
5. ज्या उमेदवारांची नियुक्ती ही मागास प्रवर्गातून झालेली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती दिनांकापासून 2 महिन्याचा आत जातवैधता प्रमाणपत्र प्रशासनाकडे सादर करणे अनिवार्य आहे.
6. ज्या उमेदवारांना महानगरपालिकेची नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी 2 महिन्यांची पूर्व नोटीस देणे आवश्यक आहे किंवा 2 महिन्याच्या मूळ पगाराइतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.
7. सदर उमेदवारांची नेमणूक ही संपूर्णतः हंगामी स्वरुपाची असल्याने, त्यांना कोणतेही कारण न दर्शविता नोकरीतून नोटीस न देता कमी करणेत येईल.
8. नियुक्तीचे ठिकाणी हजर होताना ते जर अन्य़ ठिकाणी नोकरीस असतील तर त्या संस्थेचा कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा हजर करणे आवश्यक आहे.
9. सदर उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेसंबंधी व इतर कागदपत्रे / प्रमाणपत्राबाबत सोलापूर महानगरपालिकेची दिशाभूल केली आहे अथवा खोटी कागदपत्रे सादर केलेली आहेत असे यापुढे केव्हाही निदर्शनास आल्यास त्यांना तात्काळ नोकरीतून कमी करण्यात येईल.
10. **सदर नेमणूकीचे आज्ञापत्र मिळाल्यापासून 7 (सात) दिवसाचे आत सामान्य प्रशासन विभागाकडे रुजू व्हावे.** सदरचे आदेश मिळूनही ते सबळ कारणामुळे हजर राहू शकत नसतील व ती कारणे मा. आयुक्तांचे समाधान करुन शकत नसतील तर त्यांचे नाव प्रतिक्षायादीतून सेवकवर्ग

निवड समितीच्या दि. 13.02.1980 चे मंजूर नियमानुसार कमी करण्यात येईल व त्यानंतर त्या पदावरील नेमणुकीबाबत त्यांचे कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

11. उपरोक्त नियुक्त उमेदवारास शासन निर्णय क्र.अंनियो-105/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 व शासन निर्णय क्र.अंनियो-2012/प्र.क्र.96/सेवा-4, दिनांक 27/08/2014 मधील तरतूदीनुसार राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (National Pension System) योजना लागू राहिल. याशिवाय शासनाकडून याबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहतील.

12. नियुक्ती पदावर हजर होताना शासन निर्णय दि.1 जुलै 2005 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतूदीनुसार उमेदवारास लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबत भविष्यात माहिती खोटी/चुकीची आढळून आलेस संबंधीतांना शासकीय सेवेतून तात्काळ कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकण्याचे संपूर्ण अधिकार हे नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

13. पोलीस खात्याकडून वर्तणूकीचा दाखला 30 दिवसाचे आत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे. उपरोक्त कालावधीत दाखला हजर न केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

14. नियुक्त उमेदवारांने दोन वर्षाकरीता एकवट वेतनावर काम करणेस तयार असलेबाबत हमीपत्र सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे.

(डॉ. सचिन ओम्बासे, भा.प्र.से)
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका**

**प्रति,**

संबधित उमेदवार व संबधित विभाग

**प्रत**

1. मुख्यलेखापाल विभाग
2. अंतर्गत लेखापरिक्षक
3. सेवापुस्तक विभाग, सा.प्र.विभाग
4. मुख्यलेखापरिक्षक विभाग
5. संगणक विभाग
6. निवड नस्ती- आस्था-4